# G.B.Murarka Arts & Commerce College, Shegaon Dist. Buldana

## Name of the Department :- Department of NSS

Dept.Coordinator- NILESH ASHOKRAO DEWAR    Academic Year-2019-20

Date of Meeting Opening Yr-01/07/2019    Date of Meeting Closing Yr.-30/04/2020

## Main Objective of Department of NSS -

1. The main objective of the national service scheme NSS is developing the personality and character of the student youth through voluntary community service.

**Activity /Agenda of Dept. Planned / Achieved during Academic year 2019-20**

1. 33 कोटी वृक्षलागवड कार्यक्रमामध्ये सहभाग.
2. पतंजली योग समिती च्या विद्यमाने योग संम्मेलन आयोजित दि. 18.09.2019
3. Plastic mukti shramdaan abhiyan:-02 october 2019
4. No tobacco day :- 11/7/19 Pledge given by Prof. N. A. Dewar, no to use tobacco. 170 N.S.S. volunteers & Students were participated.
5. मतदार जागृती वकृत्व स्पर्धा 60 विद्यार्थ्यांचा सहभाग. दि 30.09.2019
6. दिव्यांग दिंडी रॅली दि. 03.12.2019
7. निवासी विशेष शिबीर दत्तक ग्राम जवळा
8. रक्तदान शिबीर दि. 07.02.2020
9. विभागीय स्तर युवा प्रशिक्षण शिबिर 2018–19 मध्ये दोन विद्यार्थ्यांचा सहभाग.

| Position in Constitution | Name of Person | Designation |
|---|---|---|
| **1.Chairperson** | DR.A.L.RATHOD | **Principal** |
| **2.Coordinator** | NILESH ASHOKRAO DEWAR | **Librarian** |
| **3.Male Students** | Sagar S. Babhulka | Student |
| **4.Male Students** | Rahul Sanjay Yeralikar | Student |
| **5.Male Student** | Harish Rajendra Ugale | Student |
| **6.FeMale Student** | Vishakha Vinod Tayade | Student |
| **7.FeMale Student** | Mitali Surajsing Solanke | Student |
| **8.Female Students** | Sujata Santosh Bute | Student |
| **9.IQAC –Member/Coordinator** | Dr.Rajkumar M. Sharma | **Asst.Prof.** |

The above activity / Agenda Planned / Achieved as per the following Departmental Constitution formed –

**Sign of Dept Coordinator**    **Principal**

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Recognized by Govt of Maharashtra &
Affi. to S.G.B. Amravati University, Amravati

Dr. Anilkumar L. Rathod
Principal
Email-anilkumarairi@gmail.com
Cell - 9423428212

Shegaon Education Society, Shegaon's

# G.B.Murarka Arts & Commerce College

SHEGAON 444203 DIST BULDHANA (M.S.)

Re-accredited with "B" Grade by NAAC, Banglore (CGPA-2.77)
* Jr. Coll.No. 04.09.001 * Sr.Coll. No. 305
☎Office : 07265 - 252049
E-mail - gbmacc305@sgbau.ac.in.
website - www.gbmurarkacollege.com

No. ______________ Dt. 07/08/2019

O/C

प्रती,

मा. संचालक

राष्ट्रीय सेवा योजना

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती,

अमरावती

**विषय – वृक्ष लागवड 2019 अहवाल स्विकारणे बाबत...**

संदर्भ – आपले पत्र कं. संगाबाअवि / रासेयो / 17 / 147 / 2019 दि. 01.08.20019 नुसार

मा. महोदय,

वरील विषयानुसार 33 कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमाअंतर्गत आमच्या महाविद्यालयाला दिलेले 130 वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट पुर्ण केले असुन तशी सर्व माहिती वनविभागाच्या पोर्टलवर ऑनलाईन अपलोड सुध्दा केली आहे.

वृक्ष लागवडीचा छायाचित्रासह अहवाल आपणाकडे सादर करीत आहोत.

| महाविद्यालयाचे नाव | दिलेले उद्दिष्ट | खोदलेल्या खडयांची संख्या | लावलेल्या झाडांची संख्या |
|---|---|---|---|
| ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगावं जि. बुलढाणा | 130 | 134 | 134 |

Received
8-8-19

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon7

# ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय,
# शेगावं जि. बुलढाणा

## वृक्षलागवड अहवाल

सत्र 2019 मधिल 33 कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्टय पुर्ण करण्याकरीता आमच्या ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगावं येथे नियोजित उद्दीष्टानुसार दि. 20/07/2019, 25/07/2019 आणि 27/07/2019 अशा तिन टप्यात एकुण 134 वृक्षांची लागवड करण्यात आली.

सदर उपक्रम श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका, संचालक, शेगाव शिक्षण संस्था, शेगाव आणि प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्ष लागवडीचे नियोजन करून महाविद्यालयातील NSS, NCC and Sports Departments चे समन्वयक प्राध्यापक आणि विद्यार्थी (75) यांच्या सहभागातुन खड्डे खोदण्याची कार्यवाही करून वृक्ष लागवड उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या उपक्रमामध्ये महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा सहभाग आहे

वृक्ष लागवड करतांना कडू लिंब, कडुबदाम, बकुळी, सप्तपर्णी, आपटा इत्यादी जातीच्या वृक्षांची लागवड केली याबाबत खडयांसह वृक्ष लागवडीचे फोटो इतर माहिती www.mahaforest.gov.in या वेबसाईट वर अपलोड केली आहे.

| महाविद्यालयाचे नाव | दिलेले उद्दिष्ट | खोदलेल्या खडयांची संख्या | लावलेल्या झाडांची संख्या |
|---|---|---|---|
| ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगावं जि. बुलढाणा | 130 | 134 | 134 |

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon7




वृक्ष लागवड करतांना महाविद्यालयाचे प्राचार्य, अनिलकुमार राठोड, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश देवर, राज्यशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. व्ही. के. गायकवाड, एनसीसी प्रमुख प्रा. एच. पी. सोळंके व शिक्षकेत्तर कर्मचारी श्री कवरे सोबत विद्यार्थी.




Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon








वरीलप्रमाणे महाविद्यालयात टप्याटप्याने वृक्ष लागवड करण्यात आली. छायाचित्रासह सदर वृक्ष लागवडीचा अहवाल आपणाकडे सादर करीत आहोत.

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

दुरध्वनी : ०७१२ २६६०९४७

Email : directornss@sgbau.ac.in


क्र.संगाबाअवि/रासेयो/१७/१९१/२०१९
दिनांक : ०५/१०/२०१९

**महत्वाचे व तातडीचे**

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालय,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती

**विषय :- सत्र २०१९-२० चा त्रैमासिक अहवाल पाठविणेबाबत...**
**संदर्भ : F.No.22/7/NSS/RC/2019-102 t 132यांचा दि. २४ सप्टेंबर, २०१९ रोजी प्राप्त**

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सत्र २०१९-२० मधील रासेयोचा त्रैमासिक (जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर, २०१९ या तीन महिण्याचा) अहवाल शासनाकडून सोबल दिलेल्या प्रपत्रामध्ये मागविण्यात आलेला आहे. सदर अहवाल शासनाला करावयाचा आहे. तरी सोबत दिलेल्या सहपत्रानुसार आपल्या महाविद्यालयाचा अहवाल राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे अत्यंत तातडीने पाठविण्यात यावा.

आपला,

(डॉ. राजेश बुरंगे)
प्र.संचालक,
राष्ट्रीय सेवा योजना

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

(305)

# ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय,
# शेगावं जि. बुलढाणा

Dt. 30/09/2019

## मतदार जनजागृती कार्यक्रम अहवाल

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या निर्देशानुसारं राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने तसेच निवडणूक साक्षरता क्लब च्या माध्यमातुन ''लोकशाहीत मतदाराची भूमिका'' या विषयावार वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. सदर कार्यक्रम श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारका, संचालक, शेगाव शिक्षण संस्था, शेगाव आणि प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम पार पडला.

या स्पर्धेमध्ये शुभम इंगळे, प्रदिप जाधव, विशाल चोपडे, विशाखा तायडे, प्रणाली शेगोकार, प्रज्ञा वाकोडे, वैशाली पिंपळकार व निकीता शेंद्रे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये कु. वैशाली पिंपळकार या विद्यार्थीनीने प्रथमं क्रमांक मिळविला. परीक्षक म्हणुन डॉ. आर. एम. शर्मा व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश देवर यांनी कार्य केले. यावेळी कार्यक्रमाला डॉ. व्ही. के. गायकवाड यांनी लोकशाहीत मतदाराची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले, डॉ. आर. एम. शर्मा यांनी वकृत्व स्पर्धेविषयी आणि तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन प्रा. पी. बी. गायकवाड यानी मतदार जागृतीवर मार्गदर्शन केले. तसेच दत्तक ग्राम जवळा येथे मतदार जागृती रॅली काढण्यात आली यावेळी विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच गावकरी, महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन कु. मोनिका भडके हिने वतर आभार कु. अंकिता कुरवाडे हिने मानले.

03/10/2019

Principal,
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

बुलडाणा | ४
मंगळवार, दि. १ ऑक्टोबर २०१९

# मुरारका कॉलेजमध्ये 'लोकशाहीत मतदारांची भूमिका' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा

*तालुका प्रतिनिधी/ ३० सप्टेंबर*

**शेगाव :** स्थानिक ग .भी. मुरारका महाविद्यालयात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यशास्त्र अभ्यास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने व निवडणूक साक्षरता क्लबच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली लोकशाहीत मतदारांची भूमिका या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले.

या स्पर्धेमध्ये शुभम इंगळे, प्रदीप जाधव, विशाल चोपडे, विशाखा तायडे, प्रणाली शेगांवकर, प्रज्ञा वाकोडे ,वैशाली पिंपळकर व निकिता शेंडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये कु. वैशाली पिंपळकर या विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळविला. या स्पर्धेचे परीक्षक डॉ. आर एम शर्मा व प्रा. निलेश देवर, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी कार्य केले. स्पर्धेनंतर डॉ.राजकुमार शर्मा यांनी स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. विनोद गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना लोकशाहीत मतदारांची भूमिका अतिशय महत्त्वाची असून लोकशाहीची दिशा मतदाराच्या दिशेवर अवलंबून असल्याचे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पी.बी. गायकवाड यांनी मतदारांचे मत अमूल्य असून मताची खरेदी-विक्री होऊ नये असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन मोनिका मडके तर आभार अंकिता कुरवाडे यांनी मानले.

# मुरारका महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

## लोकशाहीत मतदारांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन



शेगाव : मार्गदर्शन करताना प्रा. पी. बी. गायकवाड व इतर

Principal,
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Principal,
G.B.Murarka Arts & Comm
College, Shegaon







डॉ. आर. एम. शर्मा मार्गदर्शन करतांना

Principal,
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon




प्रमुख मार्गदर्शक म्हणुन डॉ. व्ही. के. गायकवाड उपस्थितांना मार्गदशन करतांना




कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पी.बी. गायकवाड मार्गदर्शन करतांना.

Principal,
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

सेवा ! सहभाग ! स्वावलंबन !

सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

शेगाव शिक्षण संस्था व्दारा संचालित

सेठ ग.भि.मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय, शेगांव, जि.बुलढाणा

राष्ट्रीय सेवा योजना

आयोजित

# विशेष श्रमसंस्कार शिबीर

## अहवाल 2019–20

दत्तक ग्राम – जवळा प.

"ओला–सुका कचरा व्यवस्थापन"

दि. 17/01/2020 ते 24/01/2020

शुकवार, दि. 17/01/2020

सेठ ग. भि. मुरारका कला व वाणिज्य महाविद्यालय, शेगांव राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सत्र 2019–20 मधील विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तक ग्राम जवळा प. येथे 17/01/2020 ते 24/01/2020 दरम्यान आयोजित करण्यात आले होते. दि. 17/01/2020 रोजी रा.से.यो. च्या शिबीरार्थींचे जि.प.प्राथमिक शाळा (मुले) जवळा प. ग्राम जवळा येथे आगमन झाले. तेथे शिबीरस्थळाची साफ–सफाई करण्यात आली. तसेच शिबीरार्थींची नांव नोंदणी करून समग्र शिबीर काळातील कार्यक्रमाबद्दलचे नियोजन करण्यात आले. यावेळी रा.से.यो. कार्यकम अधिकारी प्रा. निलेश अ. देवर तसेच प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड, प्रा. पी. बी. गायकवाड, प्रा. डॉ. आर. एम. शर्मा, रा.से.यो. उपस्थित होते.



शनिवार, दि. 18/01/2020

सकाळी विद्यार्थ्यांनी शिबीराच्या उद्‌घाटन समारंभाची पूर्व तयारी केली. उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष व उद्‌घाटक म्हणून मा. श्रीमान सेठ नंदकिशोरजी इंदरमलजी मुरारका (सचिव, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव) हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून मा. श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारीलालजी मुरारका (संचालक, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव) मा. डॉ. अचिन मुरारका, अस्थिरोग तज्ञ अकोला मा. सौ. शारदाताई नि. लांजुळकर, सभापती, पं.स. शेगाव, मा. सौ. नंदाताई ई. कळसकार, सरपंच, जवळा प., मा. श्री पी.एस. वनारसे, केंद्रप्रमुख जवळा प., मा. श्री. येवले, मुख्याध्यापक, जवळा प., मा. श्री. मो. वि. काळे, सेवानिवृत्त प्राचार्य, मा. प्राचार्य डॉ. ए. एल. राठोड कार्यक्रमाला उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मा. श्री डॉ. दीपक नागरिक, जिल्हा समन्वयक, रासेयो. इ. मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड यांनी केले. आणि

प्रास्ताविक प्रा. निलेश अ. देवर यांनी केले. तर आभार प्रा. एन. ए. देवर यांनी व्यक्त केले.

उद्घाटनाच्या कार्यक्रमानंतर 5.00 ते 7.00 वाजता शिबीरार्थ्यांकडून ग्राम जवळा येथे स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रात्री 8 ते 9.30 वाजता रा.से.यो. शिबीरार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिबीरार्थ्यांकडून 'अंधश्रद्धा निर्मुलन' या विषयावर नाटिका सादर करण्यात आली. यावेळी प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड, रा.से.यो. कार्य. अधिकारी प्रा. निलेश अ. देवर, सह–कार्य. अधिकारी प्रा. कु. एस. के. बाळापुरे उपस्थित होते.

... 3 ...

<u>रविवार, दि. 19/01/2020</u>

शिबीराच्या तिस–या दिवशी सकाळी 6 ते 7 वाजता शिबीरार्थ्यांकडून प्रार्थना व योगासने करण्यात आले व त्यानंतर सकाळची प्रार्थना घेण्यात आली. सकाळी 7 ते 8 शिबीरामध्ये अल्पोपहार व चहा देण्यात आला. त्यानंतर शिबीरार्थींनी गावामध्ये स्वच्छता जागृती रॅली सोबतच परिसर स्वच्छता उपकम राबविण्यात आला व सामाजिक, शैक्षणिक व शिबिराच्या प्रकल्पाबाबत जागृती व श्रमदान करण्यात आले. त्यानंतर स्वच्छता व जेवण करण्यात आले.

दुपारी 3 ते 5 वाजताच्या बौध्दिक सत्रामध्ये मा. प्रा. व्ही. एन. करस्कार हया अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. तर मार्गदर्शक म्हणून मा. प्रा. डॉ. राजेश कोरडे, कला वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल हे होते. त्यांनी 'लोकशाहीत मतदारांची भुमिका' या विषयावर अमुल्य मार्गदर्शन केले. यावेळी मा सौ. पुष्पाताई शि. डिगोळे, ग्रा.पं.सदस्य, जवळा, मा. सौ. मिराताई ग. डिगोळे, ग्रा.पं.सदस्य, जवळा यांची प्रमुख उपस्थित होती. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सुजाता बुटे (रा.से.यो. शिबीरार्थी) हिने केले, तर आभार प्रा.

निलेश देवर यांनी मानले. यावेळी प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड, रा.से.यो. सह कार्य. अधिकारी प्रा. कु. एस.के. बाळापुरे उपस्थित होते.

संध्याकाळी 5.00 ते 6.30 शिबीरार्थीची गट चर्चा व आढावा घेण्यात आला. त्यानंतर रात्री 6 ते 8 शिबीरार्थींचा भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर रा.से.यो.च्या विद्यार्थ्यांनी रात्री 8 ते 10 वाजता सांस्कृतिक कार्यक्रम सादर केलेत.

... 4 ...

सोमवार, दि. 20/01/2020

रा.से.यो. विशेष शिबीराचा चौथा दिवस, यादिवशी सकाळी 6 ते 7 वाजता शिबीरार्थ्यांकडून प्रार्थना व योगासने करण्यात आली. त्यानंतर 7 ते 8 वाजता शिबीरार्थ्यांना अल्पोपहार व चहा देण्यात आला. सकाळी 8 ते 12 वाजेदरम्यान "ओला व सुका कचरा व्यवस्थापन". या प्रकल्पाकरिता शिबीरार्थी श्रमदानात सहभागी झाले. त्याबरोबर शिबीरार्थ्यांकडून गावामध्ये गावक—यांशी प्रत्यक्ष संवाद करण्यात आला. यानंतर स्वयंस्वच्छता व जेवणाचा आस्वाद घेण्यात आला.

दुपारी 3 ते 5 च्या बौध्दिक सत्रामध्ये अध्यक्ष म्हणून मा.श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारीलालजी मुरारका (संचालक, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव) हे उपस्थित होते, तर मार्गदर्शक म्हणून मा. डॉ. पी. सी. डाबरे, कोल्हटकर महाविद्यालय, जळगाव जा.. यांनी 'आपत्ती व्यवस्थापन' याविषयावर शिबीरार्थींना व गावक—यांना मार्गदर्शन केले. यावेळी मा. सौ. दिपालीताई गौ. गवई, ग्रा. पं. सदस्य, जवळा, मा. सौ. योगीता म. सोनटक्के, पोलीस पाटील, जवळा, मा. श्री राजेश चौधरी अध्यक्ष, प्रेस क्लब, शेगाव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु मोनिका भडके (रा.से.यो. शिबीरार्थी) हिने केले तर आभार प्रदर्शन प्रा. नि. अ. देवर (रा.से.यो.कार्यक्रम

अधिकारी) यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड, रा.से.यो. सह कार्य. अधिकारी प्रा. कु. एस. के. बाळापुरे उपस्थित होते.

संध्याकाळी 5.30 ते 6.30 शिबीरार्थींशी गट चर्चा तसेच प्रार्थना घेण्यात आली. रात्री 6 ते 8 शिबीरार्थींचा भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर रात्री 8 ते 10 वाजता रा.से.यो. शिबीरार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये विद्यार्थ्यांकडून 'स्वच्छता जनजागृती' या विषयावर नाटिका सादर करण्यात आली. तसेच काही विद्यार्थ्यांकडून 'देशभक्तीपर गीते; सादर करण्यात आलीत.

... 5 ...

मंगळवार, दि. 21/01/2020

रा.से.यो. शिबीराचा पाचवा दिवस, यादिवशी सकाळी 6 ते 7 वाजता शिबीरार्थ्यांकडून प्रार्थना व योगासने करण्यात आली. त्यानंतर 7 ते 8 वाजता शिबीरार्थ्यांना अल्पोपहार व चहा देण्यात आला. सकाळी 8 ते 12 वाजता दरम्यान ''ओला व सुका कचरा व्यवस्थापन''. या प्रकल्पा करिता शिबीरार्थींनी श्रमदानातुन नियोजनबध्द पध्दतीने कार्य केले. तसेच संध्याकाळी 5 ते 6 यादरम्यान गावातील लोकांना ओल्या व सुक्या कचरा विभाजना बाबत माहिती देवुन जनजागृती केली.

तसेच दुपारच्या 3 ते 5 वाजता होणाऱ्या बौध्दिक सत्रामध्ये अध्यक्ष म्हणून मा. श्रीमान सेठ निलेशकुमार बसंतकुमारजी मुरारका (सदस्य, शाळा व्यवस्थपन समिती) हे उपस्थित होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मा. डॉ. डी.के. राठोड, संत गजानन महाराज कला महाविद्यालय, बोरगाव मंजू यांनी ''व्यक्तीमत्व विकास'' याविषयावर व डॉ. प्रकाश एम. चिंचोलकर, वैद्यकिय अधिकारी, आरोग्य विभाग, जि.प. बुलडाणा यानी ''साथीचे आजार आणि उपाय'' याविषयावर शिबीरार्थ्यांना तसेच गावक—यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रमुख उपस्थिती मध्ये मा. श्री संजय सुरळकर, पंस. शेगाव श्री विलास ना.

मेतकर, ग्रा.पं. सदस्य, श्री दिवाकर ह. खोंड, ग्रापं.सदस्य, जवळा हे उपस्थित होते.

तसेच शिबिराला यावेळी मा. डॉ. प्रविन डाबरे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. वैष्णवी पिंपळकार (रा.से.यो. शिबीरार्थी) यांनी केले तर आभार प्रदर्शन कु. सुजाता बुटे हिने केले. यावेळी प्रा. डॉ. आर. एम. शर्मा व प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड, रा.से.यो. कार्य. अधिकारी प्रा. निलेश अ. देवर उपस्थित होते.

संध्याकाळी 5.30 ते 6.30 शिबीरार्थींशी गट चर्चा तसेच प्रार्थना घेण्यात आली. रात्री 6 ते 8 शिबीरार्थींचा भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर रात्री 8 ते 10 दरम्यान शिबीरार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रम करण्यात आले.

... 6 ...

बुधवार, दि. 22 / 01 / 2020

रा.से.यो. शिबीराचा सहावा दिवस, यादिवशी सकाळी 6 ते 7 वाजता शिबीरार्थ्यांकडून प्रार्थना व योगासने करण्यात आली. त्यानंतर 7 ते 8 वाजता शिबीरार्थ्यांना अल्पोपहार व चहा देण्यात आला. त्यानंतर 8 वाजता "ओला व सुका कचरा व्यवस्थापन" या प्रकल्पाकरिता शिबीरार्थ्यांनी श्रमदान केले. त्याचबरोबर गावक–यांना या माहिती व्हावी याकरीता त्याबद्यल जागृती केली. यानंतर स्वयंस्वच्छता व जेवणाचा आस्वाद घेण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या दुपारच्या 3 ते 5 च्या बौध्दिक सत्रामध्ये मा. श्रीमान सेठ रविकुमारजी नंदकिशोरजी मुरारका, सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणुन मा. प्रा. एस. एम. देशमुख, माउली महाविद्यालय, शेगाव व मा. प्रा. नितीश भावरकर, माउली महाविद्यालय, शेगाव यांनी "संत गाडगे महाराजांचे दशसुत्री विश्लेषन" याविषयावर शिबीरार्थ्यांना व गावक–यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. सौ. सुशिलाताई सु. कोल्हे, उपसरपंच, ग्रा.पं.

जवळा आणि मा. श्री दिनेश अ. सावदेकर, ग्रा.पं.सदस्य, जवळा हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मोनिका भडके, शिबीरार्थी हिने केले तर आभार प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड यांनी व्यक्त केले. यावेळी, रा.से.यो. कार्य. अधिकारी प्रा. निलेश अ. देवर, उपस्थित होते.

रात्री 9 ते 10 वाजता शिबीरार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिबीरार्थ्यांकडून "भावगीत, नृत्य व देशभक्तीपर गीत" सादर करण्यात आले.

... 7 ...

गुरूवार, दि. 23/01/2020

रा.से.यो. च्या विशेष शिबीराचा सातवा दिवस, या दिवशी सकाळी 6 ते 7 वाजता शिबीरार्थ्यांकडून प्रार्थना व योगासने करण्यात आली. त्यानंतर 7 ते 8 वाजता शिबीरार्थ्यांचा अल्पोपहार व चहा झाला. त्यानंतर सकाळी 8 ते 12 दरम्यान "ओला व सुका कचरा व्यवस्थापन" याप्रकल्पा करिता शिबीरार्थ्यांनी श्रमदानाच्या माध्यमातुन कार्य पुर्ण केले. त्याचबरोबर गावक-यांना या याबाबत जागृत राहुन रोगराई कशी दुर ठेवता येईल याबाबत माहिती दिली. यानंतर स्वयंस्वच्छता व जेवणाचा आस्वाद घेण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या दुपारच्या 3 ते 5 च्या बौध्दिक सत्रामध्ये अध्यक्ष म्हणुन मा. श्रीमान सेठ सतिषकुमारजी नंदकिशोरजी मुरारका (संचालक, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव), हे उपस्थित होते. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. प्रा. डॉ. पी. व्ही. पिंगळे, श्री ज्ञा. म. बुरूंगले महाविद्यालय, शेगाव यांनी "व्यायाम आणि आजचा युवक" या विषयावर विद्यार्थ्यांना अमुल्य असे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकमाला प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्री मनोज गो. सावदेकर, ग्रा.पं.सदस्य, जवळा, मा. श्री दिनेश महाजन, अध्यक्ष, शेगाव पत्रकार संघ व मा. श्री राहुल सावदेकर, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, जवळा हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे

सुत्रसंचालन कु. स्वाती गवई हिने केले. तर आभार कु सुजाता बुटे हिने व्यक्त केले. यावेळी प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड, रा.से.यो. कार्य. अधिकारी प्रा. निलेश देवर उपस्थित होते.

संध्याकाळी 5.30 ते 6.30 प्रा. पी. बी. गायकवाड यांच्या उपस्थितीमध्ये शिबीरार्थीशी गट चर्चा करण्यात आली व त्यानंतर प्रार्थना घेण्यात आली.

मा. डॉ. दिपक नागरिक, रा. से. यो. जिल्हा समन्वयक, बुलडाणा यांच्या सुचनेनुसार रात्री 7 ते 8.30 या वेळेत खास विद्यार्थ्याकरीता ''स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व करीअर कौंसलींग'' या विषयावर मा. श्री गोपाल कान्हेरकर यांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.सदर कार्यक्रमानंतर लगेच शिबीरार्थींचा भोजनाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर रात्री 9.30 ते 10 वाजता शिबीरार्थ्यांकडून सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये शिबीरार्थ्यांकडून ''सांस्कृतीक नृत्य'' सादर करण्यात आलीत.

... 8 ...

शुक्रवार, दि. 24/01/2020

रा.से.यो. विशेष शिबीराचा शेवटचा दिवस. या दिवशी सकाळी 6 ते 7 च्या दरम्यान शिबीरार्थ्यांकडून प्रार्थना व योगासने करण्यात आली. त्यानंतर 7 ते 8 वाजता शिबीरार्थ्यांचा अल्पोपहार व चहा झाला. व शाळेचा परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच समारोपीय कार्यक्रमाची तयारी करण्यात आली.

दुपारी 12.30 वाजता समारोपीय कार्यक्रम पार पडला. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. श्रीमान सेठ नंदकिशोरजी इंदरमलजी मुरारका (सचिव, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव), तसेच प्रमुख उपस्थिती मा. श्री गौतम भगत, गटविकास अधिकारी पं.स.शेगाव, मा. सौ. स्वातीताई अनंता शेजोळे, उपसभापती पं.स.शेगाव, मा.सौ. शाजिनीताई सुखदेव सोनोने, सदस्य, पं.स.

शेगाव, आणि प्रमुख अतिथी म्हणुन मा. श्रीमान सेठ संजयकुमारजी मुरारीलालजी मुरारका (संचालक, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव), मा. श्रीमान सेठ सतिषकुमारजी नंदकिशोरजी मुरारका (संचालक, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव), मा. श्रीमान सेठ रविकुमारजी नंदकिशोरजी मुरारका, (सदस्य, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव), मा. श्रीमान सेठ निलेशकुमारजी बसंतकुमारजी मुरारका, (सदस्य, शेगांव शिक्षण संस्था, शेगांव) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिलकुमारजी राठोड हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. व्ही. के. गायकवाड यांनी केले, आठ दिवसीय निवासी शिबीराचा कामकाजाचा आढावा प्रा. निलेश देवर यांनी घेतला तर आभार प्रा. डॉ. राजकुमार शर्मा (रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी) यांनी व्यक्त केले. या समग्र शिबीराला यशस्वी करण्यासाठी शेगांव शिक्षण संस्था, शेगांवचे अध्यक्ष श्रीमान सेठ मुरारीलालजी मुरारका तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिलकुमार राठोड यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

सदर समारोपीय कार्यकम आटोपल्यानंतर सर्वांनी जेवनाचा आस्वाद घेतला व ग्राम जवळा प येथे दि. 17.01.2020 ते 24.01.2020 दरम्यान झालेल्या रा.से.यो. शिबीराची सांगता करण्यात आली.

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

## Seth G. B. Murarka Arts & Commerce College, S...

### N.S.S. Special Camp, Jawala (P)

Attendance List (Morning)

| Sr. No. | Reg. No. | Name of Volunteer | 17 Jan. 2020 | 18 Jan. 2020 | 19 Jan. 2020 | 20 Jan. 2020 | 21 Jan. 2020 | 22 Jan. 2020 | 23 Jan. 2020 | 24 Jan. 2020 | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | MH03-305-18-014 | Ashwini P. Metkar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 2 | MH03-305-18-034 | Divya V. Digole | Digole | Digole | Digole | Digole | Digole | Digole | Digole | Digole | |
| 3 | MH03-305-18-041 | Mukta P. Kokate | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 4 | MH03-305-18-015 | Dnyneshwari G. Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | D.G.Kankale | |
| 5 | MH03-305-18-086 | Sushma V. Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | S.V.Akarte | |
| 6 | MH03-305-19-030 | Mina S. Jawlekar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 7 | MH03-305-19-027 | Punam C. Masne | P.C.Masne | P.C.Masne | P.C.Masne | P.C.Masne | P.C.Masne | P.C.Masne | P.C.Masne | P.C.Masne | |
| 8 | MH03-305-19-026 | Vaishnavi H. Kale | V.H.Kale | V.H.Kale | V.H.Kale | V.H.Kale | V.H.Kale | V.H.Kale | V.H.Kale | V.H.Kale | |
| 9 | MH03-305-19-024 | Dipali M. Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | D.M.Hadole | |
| 10 | MH03-305-18-008 | Monika R. Bhadke | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 11 | MH03-305-19-073 | Vaishnavi B. Pimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | Vpimpalkar | |
| 12 | MH03-305-19-069 | Jyoti P. Tayade | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 13 | MH03-305-19-094 | Vaishnavi S. Kanhenkar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 14 | MH03-305-19-019 | Sandhya R. Kanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | Sanhenkar | |
| 15 | MH03-305-19-052 | Sukeshni P. Sawdekar | S.P.Sawdekar | S.P.Sawdekar | S.P.S | S.P.S | S.P.S | S.P.S | [signature] | [signature] | |
| 16 | MH03-305-19-062 | Yogita P. Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | Y.P.Masne | |

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

## Seth G. B. Murarka Arts & Commerce College, Shegoan

### N.S.S. Special Camp, Jawala (P)

Attendance List (Morning)

| Sr No | Reg. No. | Name of Volunteer | 17 Jan. 2020 | 18 Jan. 2020 | 19 Jan. 2020 | 20 Jan. 2020 | 21 Jan. 2020 | 22 Jan. 2020 | 23 Jan. 2020 | 24 Jan. 2020 | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 17 | MH03-305-19-081 | Manisha R. Anasane | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 18 | MH03-305-19-035 | Ujwala S. Wadhokar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 19 | MH03-305-19-093 | Shubhangi G. Kalaskar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 20 | MH03-305-18-064 | Sujata S. Bute | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 21 | MH03-305-19-082 | Mayur P. Tayade | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 22 | MH03-305-19-023 | Vijay B. Kolhe | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 23 | MH03-305-19-042 | Tejas S. Karale | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | | |
| 24 | MH03-305-19-025 | Ajay O. Awarakar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 25 | MH03-305-19-058 | Vijay N. Gawai | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 26 | MH09-305-19-079 | Vikram V. Akare | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 27 | MH03-305-19-083 | Harish J. Kare | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 28 | MH03-305-19-097 | Sopan R. Karale | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 29 | MH03-305-19-005 | Rajesh B. Rahate | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | | | |
| 30 | MH03-305-19-009 | Ganesh R. Khedkar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | | |
| 31 | MH03-305-19-090 | Prem B. Sonone | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 32 | MH03-305-19-087 | Aniket B. Ingle | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |

[signature]

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

### Seth G. B. Murarka Arts & Commerce College, Shegaon

## N.S.S. Special Camp, Jawala (P)

Attendance List (Morning)

| Sr. No. | Reg. No. | Name of Volunteer | 17 Jan. 2020 | 18 Jan. 2020 | 19 Jan. 2020 | 20 Jan. 2020 | 21 Jan. 2020 | 22 Jan. 2020 | 23 Jan. 2020 | 24 Jan. 2020 | Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 33 | MH03-305-19-075 | Sunil D. Surwade | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 34 | MH03-305-19-088 | Moh. Asim sk. saleem | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] |
| 35 | MH03-305-18-054 | Rahul S. yeralikar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | | |
| 36 | MH03-305-19-078 | Rushikesh S. Kamberkar | R.SK | R.S.K | R.S.K | R.SK | R.S.K | R.S.K | R.SK | R.SK | |
| 37 | MH-03-305-19-100 | Shivraj B. Shegokar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | | |
| 38 | MH03-305-19-045 | Ajinkya P. Sawale | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 39 | MH03-305-19-091 | Sagar G. Tayade | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 40 | MH03-305-18-037 | Gajanan D. Kalaskar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 41 | MH03-305-19-021 | Sagar S. Bhabhulkar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 42 | MH03-305-18-029 | Gopal M. Dhege | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 43 | MH03-305-19-016 | Sanghdip P. Gawai | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 44 | MH03-305-19-076 | Ku. Pooja S. Jamave | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 45 | MH03-305-18-006 | Ku. Kanchan G. Masne | K.G.Masne | K.G.Masne | K.G.Masne | K.G.Masne | K.G. Masne | | | | |
| 46 | MH03-305-18-050 | Nagesh Pralhad shegokar | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 47 | MH03-305-18-033 | Vishal Abhimanyu Chopade | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 48 | MH03-305-18-038 | Ankit G. Deshmukh | Adeshmukh | Adeshmukh | Deshmukh | Adeshmukh | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 49 | MH03-305-19-043 | Pradip G. Jadhao | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |
| 50 | MH03-305-19-046 | Vishal G. Gawai | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | [signature] | |

[signature]

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

शिबिरा दरम्यान राबविलेल्या कार्यक्रमांचे फोटोग्राफ



ओला–सुका कचरा व्यवस्थापन



Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

# श्रमसंस्कार शिबिरे सामाजिक मूल्ये जोपासणारी ठरावीत -डॉ. दीपक नागरिक

[illegible]



[illegible]

## तुटलेल्या तारेने घेतला [illegible]

[illegible]



[illegible]

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

पतंजली योग समिती च्या विद्यमाने योग संम्मेलन आयोजित दि. 18.09.2019





Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

Plastic mukti shramdaan abhiyan:-02 october 2019





Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

**No tobacco day :- 11/7/19 Pledge given by Prof. N. A. Dewar, no to use tobacco. 170 N.S.S. volunteers & Students were participated.**







मतदार जागृती वकृत्व स्पर्धा 60 विद्यार्थ्यांचा सहभाग. दि 30.09.2019

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon







दिव्यांग दिंडी रॅली दि. 03.12.2019

Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon









Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon







Principal
G.B.Murarka Arts & Comm.
College, Shegaon

सेवा ! सहभाग ! स्वावलंबन !

सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

शेगाव शिक्षण संस्था व्दारा संचालित

सेठ ग. भि. मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय,

शेगांव, जि.बुलढाणा

# राष्ट्रीय सेवा योजना

सत्र

2019 – 2020

# नियमित कार्यक्रम अहवाल

सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित

सेठ ग.भि.मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय, शेगांव, जि.बुलढाणा

राष्ट्रीय सेवा योजना आयोजित

**2019–20**

वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन दिवस साजरा 1 जुलै, 2019

